॥ ॐ ॥

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

मार्च २०२४

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११ ०११.
(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६
Email : wardhinee@gmail.com
Website : http://www.swaroopwardhinee.org

## ८ मार्च जागतिक महिला दिन



नका हिणवू तिला संबोधून अबला
ती दुर्गा ती भवानी ती तर खरी सबला ।

जन्म देते बाळाला सहन करून प्रसव वेदना
तिच्या परी दुजा कोणी न जाणे सह संवेदना ।

पादाक्रांत करते सर्व क्षेत्रे सहज घेते गगन भरारी
म्हणूनी गातो थोरवी तिची तो मुरलीधर मुरारी ।

तिची रुपे अनंत जशी जिजाऊ,
हिरकणी, निवेदिता, अन् सावित्री
कधी मेणाहून ही मऊ तर कधी कणखर ही धरित्री ।

असो सहकारी, आजी, लेक, पत्नी, अथवा माता
नका अवहेलू तिज सन्मान करा तिचा सर्वथा ।

- अरविंद वि. केळकर

## सर्व मातृशक्तीला महिला दिनाच्या

## हार्दिक शुभेच्छा

# उत्थान विभाग

◆ क्रांतीज्योती नारी संमेलन सहभाग – चार फेब्रुवारीला बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय पुणे येथे भव्य नारी संमेलन आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये उत्थान विभागातील अभ्यासिका प्रमुखांनी सहभाग घेतला.

◆ किशोरी विकास एकत्रीकरण –

कसबा भाग – दि. ११ फेब्रुवारीला प्रबोध सभागृहात किशोरी एकत्रीकरण घेण्यात आले. हेमांगी ताईंनी किशोरींना प्रसारमाध्यम व त्यांचे दुष्परिणाम याविषयी माहिती सांगितली. मोबाईल उपयोगी आहे त्याचबरोबर त्याचा अतिवापर कसा घातक आहे हे ताईंनी अतिशय छान रीतीने समजावून सांगितले.

भवानी भाग – दि. १८ फेब्रुवारीला किशोरी एकत्रीकरण शांताबाई लडकत शाळा, नाना पेठ येथे घेण्यात आले. आपले मानसिक आरोग्य कशा प्रकारे जपावे या विषयावर अनुजाताईंनी मुलींचे चर्चात्मक सत्र घेतले. मुलींनी आपल्या भावना कशा ओळखाव्या, कशा प्रकारे आपल्या रागावर नियंत्रण ठेवावे. तसेच Balloon Activity Game माध्यमातून आपल्या मनामध्ये कोणत्याही गोष्टी साठवून त्याचा ताण घेऊ नये, आपल्या गोष्टी आपल्या मैत्रिणीला, आईला यांना सांगाव्यात अशी बरीच मौलिक माहिती त्यांनी मुलींना दिली.

◆ वार्षिक सांस्कृतिक स्नेहसंमेलन २०२४ (महात्मा फुले भाग) – दि. २५ फेब्रुवारी केशवराव जेधे शाळा गंज पेठ येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त महात्मा फुले भागात अभ्यासिकेमधील मुलांसाठी त्यांच्या गुणांना वाव मिळण्याकरिता सांस्कृतिक स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमासाठी एकूण उपस्थित संख्या ३२२ एवढी होती. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून मा. प्रियंका बेहरा, संचालिका CSR RSB Foundation व अध्यक्षा म्हणून केशवराव जेधे शाळेच्या मुख्याध्यापिका मा. ज्योती मानकर उपस्थित होत्या. पालकवर्ग आणि अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साही वातावरणात संपन्न झाला.














# युवा विभाग



◆ निर्माण शाखा – ११ वी केंद्रीय एकत्रीकरण –

उद्दिष्ट : ◆ एकत्रीकरण व परिचय.

◆ महाविद्यालयीन वयातील प्रश्न व त्याकडे बघण्याचा दृष्टिकोन.

दि. २५ फेब्रुवारीला युवकांच्या एकत्रीकरणांतर मैदानी खेळ घेण्यात आले. त्यानंतर युवकांचे ३ गट पाडून त्यांना उद्दिष्टाला अनुसरून काही विषय देऊन त्यावर चर्चा घेण्यात आली. चर्चेचा समारोप सुरेश पवार दादाने केला. शिववंदना व प्रार्थना घेऊन समारोप करण्यात आला.



# शाखा विभाग

शाखाशः तासिका विभागांतर्गत या महिन्यात ◆ वर्धकांची पाढे आणि निबंध स्पर्धेची तयारी करून घेण्यात आली. ◆ 'स्व'-अभ्यास आणि आठवड्यातून १ दिवस अवांतर वाचन घेण्यात आले.

शाखाशः कार्यक्रम विभाग - ◆ परिपाठ व मानसिक विकास बैठक नियमित झाली. ◆ दैनंदिन कार्यक्रम आणि शाखा चषकातील उपक्रमांची पूर्व तयारी आणि त्या संदर्भातील काही उपक्रम घेण्यात आले. ◆ शिवजयंती निमित्त काही शाखांनी जवळच्या परिसरात मल्लखांब प्रदर्शन व मर्दानी खेळ सादर केले. ◆ उत्कृष्ट शाखा चषक २०२४ (फेब्रुवारी महिन्यातील काही उपक्रम) ◆ दि. १५ जानेवारी ते २५ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत सहल/क्षेत्रभेट आयोजन करणे. यामध्ये रामकृष्ण शाखेची हरिश्चंद्रगड आणि विवेकानंद शाखेची राजगड येथे सहल झाली. वर्धकांची शारीरिक क्षमता तपासणे, इतिहासाची व गडांची ओळख करून देणे या उद्दिष्टांना अनसुरून सहल पूर्ण करण्यात आली.

◆ दि. २५ फेब्रुवारीला ५ वी ते ९ वी पर्यंतच्या वर्धक-वर्धिकांची इतिहास-भूगोल प्रश्नमंजूषा तसेच पाढे पाठांतर स्पर्धा घेण्यात आली.

भगिनी निवेदिता शाखा - या महिन्याच्या पहिल्या आठवड्यात तोत्तोचान हे पुस्तक वाचून पूर्ण झालं. त्यावर मुलींशी चर्चा करण्यात आली. कोणत्याही एका लेखकाची किंवा कवीची माहिती या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या महिन्यात मराठी भाषा दिनानिमित्त वि. वा. शिरवाडकर यांची पुस्तकं मुलींना वाचण्यासाठी दिली.

राजर्षी शाहू महाराज शाखेने विज्ञान दिनानिमित्त श्री. योगेश तांबट यांच्या उपस्थितीत 'वैज्ञानिक' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेतली.














### रथसप्तमी - सूर्यनमस्कार

सहभागी शाखा - ७, वर्धक - २००, युवक - ४०, पालक - २०, शालेय विद्यार्थी - २५०, अन्य व्यक्ती - ३०, एकूण सूर्यनमस्कार - १७९३४

| क्र. | शाखा नाव | तपशील | एकूण सूर्यनमस्कार |
|---|---|---|---|
| १) | रामकृष्ण शाखा एकूण - ३६ | आरोग्य दिंडी काढून त्यात आरोग्यविषयी माहिती सांगण्यात आली व त्यानंतर वर्धकांचे सूर्यनमस्कार घेण्यात आले. वर्धक युवकांनी प्रत्येकी ५१ सूर्यनमस्कार घातले. | १८३६ |
| २) | विवेकानंद शाखा एकूण - २५ | स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त नियोजनानुसार ७५ ठरलेले असताना प्रत्येक वर्धक युवकाने प्रत्येकी १०८ सूर्यनमस्कार घातले. | २३७६ |
| ३) | ब्रह्मानंद शाखा एकूण - ४० | श्री. श्रीकांत घोडे सरांनी सूर्यनमस्कार व त्याचे महत्त्व सांगितले. उपस्थित पालकांनी एकूण १०० सूर्यनमस्कार घातले. लक्ष्मीकांत सुतार या वर्धकाने १५० सूर्यनमस्कार घातले. | २५०० |
| ४) | सुबोधानंद शाखा एकूण - ३५ | सगळ्यांना सूर्यनमस्काराचे फायदे सांगितले व प्रत्येक वर्धक युवकाने, १३ सूर्यनमस्कार मारले. | ७२८ |
| ५) | शाहू शाखा एकूण - ३१४ | दि. १६,१७ व १८ जानेवारी असे तीन दिवस उपक्रम झाला. शाखा परिसरातील ४ बागेत जाऊन युवकांनी उपस्थित नागरिकांना सूर्यनमस्कार घालण्यास प्रेरित केले. तसेच परिसरातील २ शाळांमधील मुलांना संविधानाचे महत्त्व सांगण्यात आले. | ४८०० |
| ६) | नरवीर शाखा एकूण-३५ | रथसप्तमीच्या दिवशी वर्धक, युवकांनी प्रत्येकी ६५ सूर्यनमस्कार घातले. | १९५० |
| ७) | शंभूराजे शाखा एकूण-४० | रथसप्तमीच्या दिवशी वर्धक, युवकांनी प्रत्येकी १०४ सूर्यनमस्कार घातले. | ३७४४ |
| | | एकूण | १७९३४ |






# पाकोळी बालवाडी

नियोजित अभ्यासक्रमाबरोबर बालवाडीत झालेले विशेष कार्यक्रम –

◆ **क्षेत्रभेट** – शिवजयंतीला दि. १९ फेब्रुवारी, मोठ्या गटाची सहल लालमहालात आयोजित करण्यात आली. शेजारील जिजामाता बागेतील खेळण्यांवर खेळून मुले लालमहालात आली. महालातील सर्व मूर्तींमधून लक्षात येणाऱ्या शिवरायांच्या बालपणीच्या गोष्टी स्नेहलताईंनी मुलांना सांगितल्या.

◆ **लग्न सोहळा** – मुलांना लग्न समारंभाचा अनुभव व आनंद घेता यावा या उद्देशाने दि. १४ फेब्रुवारी वर्धिनीच्या ओंकार सभागृहात दु. ११.३० च्या मुहूर्तावर बाहुला बाहुलीच्या लग्नाचा सोहळा उत्साहात झाला. सौ. अश्विनीताईंच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी मंचावर छानसा मांडव घातला. सभागृह फुलपानांच्या माळांनी सजवले. सौ. मनीषाताई, प्रीतीताई व बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्गाच्या ताईंनी मिळून सर्व रुखवत मांडले. पालकांना व पाहुण्यांना हे रूखवत बघताना लहानपणी खेळलेल्या भातुकलीची आठवण झाली. बाहुल्याची वरात मोठ्या गटातील मुलांनी वाजत गाजत मारुती मंदिरापासून वर्धिनीत आणली. सभागृहात आल्यावर बाहुल्याचे पाहुण्यांनी, श्रीमती आरती कुलकर्णी व पुष्पाताईंनी औक्षण केले. मंचावर जाण्याआधी सर्वांचे स्वागत मोठ्या गटातील मुला-मुलींच्या ‘नवराई माझी लाडाची...’ या नृत्याने झाले. छायाताईंनी मंगलाष्टके म्हटली आणि टाळ्यांच्या, सनईच्या गजरात लग्न लागले. वऱ्हाडी मुला-मुलींसाठी मिष्टान्नाचे जेवण होते. पालकांनी देणगी स्वरूपात आहेर व भेटकार्ड दिली.

◆ **मराठी भाषा गौरव दिन** – २७ फेब्रुवारी, कुसुमाग्रज जयंती उत्साहात साजरी झाली. मधल्या गटातील मुलांनी खादी फलकावर मुळाक्षरे व अंक चित्रांप्रमाणे लावली, तर मोठ्या गटात शिक्षकांनी मुलांच्या नावाच्या पाट्या तयार केल्या. मुलांनी स्वतः त्या ओळखून त्याच्यावर लाकडी भुसा चिकटवला व पालकांनी याची छानशी फोटो फ्रेम तयार केली. बालवाडीची आठवण म्हणून ती प्रत्येकाच्या घरात लावली गेली आहे.

◆ **विज्ञान दिन** – लहान गटातील मुलांनी शरीराचे अवयव सांगणारे ‘एक आहे नाग’ व हवेचा उपयोग सांगणारे ‘फुगा फुगा...’ हे गाणे सादर केले. मुलांना तापमानाची ओळख गार पाणी-गरम पाणी या प्रयोगातून शिक्षकांनी करून दिली. ओंकार सभागृहात मधल्या व मोठ्या गटातील मुलांनी ‘प्रयोगांचे प्रदर्शन’ मांडले होते. मूळ रंग, मानवी शरीराचे अवयव, जलचक्र, ज्वलनास हवेची गरज असते, पाण्याची घनता, केंद्रीय बल यावर आधारित प्रयोगांचे प्रात्यक्षिक मुलांनी सादर केले. पाहुण्यांच्या प्रश्नांना अचूक उत्तरे देऊन सर्वांनी शाबासकी मिळवली. पालकांनी सर्व प्रयोग पाहून मुलांचे खूप कौतुक केले.








# रूग्ण सहाय्यक वर्ग

माले, पुणे व चऱ्होली या वर्गातील विद्यार्थी नियमित दवाखान्यातील कामांचा सराव वेगवेगळ्या ठिकाणी घेत आहेत. त्यातून बीपी घेणे, बेड मेकिंग, शुगर तपासणी, ट्रॉली लावणे व स्वच्छ करणे, सलाईन चालू-बंद करणे, इसीजी काढणे, ड्रेसिंग करणे, औषधे देणे इत्यादी कामे करीत आहेत. हे करताना त्यांना कधी प्रत्यक्षात ऑपरेशन किंवा डिलिव्हरी बघायला मिळते. यातूनच विषयाची सखोल माहिती मिळायला मदत होते.

◆ **व्याख्यान** - पुणे वर्गात दि. १५ फेब्रुवारीला 'त्वचा दान' या विषयावर डॉ. रोहिणी आठवले यांचे व्याख्यान झाले. शरीराच्या इतर अवयवांप्रमाणे मरणानंतर आपली त्वचा दुसऱ्या मानवाला उपयोगी पडते हे नव्यानेच सगळ्यांना समजले. उघडी पडलेली जखम बरी करण्याकरता दान केलेल्या त्वचेचा उपयोग बँडेजसारखा होतो. जखम पूर्णपणे भरून आली की ही त्वचा काढली जाते. मृत व्यक्तीची त्वचा नातेवाईकांच्या संमतीने घेतली जाते. जिवंतपणी दानाचा अर्ज भरून याची सहमती देऊ शकतो. दान केलेली त्वचा पाच वर्षापर्यंत जतन करता येते. या गोष्टी डॉ. रोहिणीताईंनी सोप्या भाषेत मुलींना समजावून सांगितल्या.





